# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२१/०८/२०१९
## दि.२१/०७/२०१९ रोजी दु.१२/०० वा.ते २२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५६७/१९,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६,३५२, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ आणि क्रि.लॉ. अमेंडमेंट कलम ७ (अ) |
| **फिर्यादी** | राहुल वायबसे, वय २८ वर्षे,रा- वडगाव बु//. पुणे |
| **आरोपी** | ७ ते ८ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/२०१९ रोजी २२/०० वा चे सुमारास, समाज मंदीर समोरील सार्वजनीक रोडवर, तुकाईनगर, वडगाव बु//, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचे मित्र हे गणपती मंडळाचे मिटींगकामी समाज मंदीर समोरील सार्वजनीक रोडवर, तुकाईनगर, वडगाव बु, पुणे येथे एकत्र जमले असताना एक पांढऱ्या रंगाची सफारी गाडी मध्ये तसेच एफझेड, पल्सर व मोपेड मोटार सायकलवर यातील नमुद इसमांनी हातामध्ये लोखंडी कोयते घेवून आजु बाजूस असलेल्या दुकानदारांना मोठ मोठ्याने ओरडून करुन,शिवीगाळ करुन,दुकान दारांना दुकान बंद करा असे म्हणुन हातामधील कोयते जोर जोरात हवेत फिरवुन दहशत करुन फिर्यादी यांना “थांब तुला खल्लासच करतो” असे म्हणून त्याने त्याचे हातामध्ये असलेला लोखंडी कोयता फिर्यादी यांना मारला पण तो कोयता फिर्यादी यांनी चुकवला म्हणुन त्यांना तो लागला नाही. यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांना कोयता फेकुन मारुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न दहशत पसरली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुधीर घाडगे ९४०३४४२०३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५६८/१९,भादविक ३०७,३२८, |
| **फिर्यादी** | बालाजी साळुंखे, सहा.पो.निरी.सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे. |
| **आरोपी** | गोकुळा शामराव साबळे,वय २५ वर्षे, रा.पारी कंपनी चौक,नऱ्हे,पुणे (मयत ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/०८/२०१९ रोजी संध्याकाळी ०५.३० वा. रोजी राहत्या घरी |
| **तपशिल** | महिला नामे गोकुळा शामराव साबळे, वय २५ वर्षे, रा.पारी कंपनी चौक नऱ्हे पुणे हिचा पो.हवा. मते यांनी दि. १९/०८/२०१९ रोजी समक्ष नवले हॉस्पीटल येथे जबाब नोंदविला असुन त्यानुसार फिर्यादी यांना खात्रीलायक समजले की, इसम नामे शाम साबळे रा. सदर यांस दारु पिण्याचे सवय असुन, त्याने दि.१९/०८/२०१९ रोजी दारु पिऊन पत्नीस कौटुबिक कारणावरुन भांडणे करुन, शिवीगाळ करुन मारहाण केली त्यामुळे महिला नामे-गोकुळा शाम साबळे हिने रागाच्या भरात उंदिर मारण्याचे औषध विकत आणुन स्वता प्राशन करुन, तिची मुलगी नामे कु. पुजा वय ४ वर्षे, हिस जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने उंदिर मारण्याचे औषध पाजले म्हणुन फिर्यादी यांची महिला नामे गोकुळा शामराव साबळे हिचे विरुद्ध भा.द.वि. कलम. ३०७, ३२८ अन्वये सरकार पक्षातर्फे कायदेशीर तक्रार आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील ९५९५५१५९११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५७०/१९,भादविक ३०६,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | कुंडलीक भुरके, वय २८ वर्षे,रा.मु.भोळवा, ता.कळमनुरी, जि.हिंगोली |
| **आरोपी** | शामराव साबळे, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/२०१९ रोजी सायं.१७/३० वा.चे सुमारास जय कुमार कुटे यांचे रुममध्ये शिवशक्ती पावर डिवाईस शेजारी अभिरुची नऱ्हे पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मेव्हणा यातील नमुद इसम शामराव साबळे, यांला दारु पिण्याचे वेसन असुन, तो यातील फिर्यादी यांची बहिण गोकुळा शामराव साबळे हिस नेहमी दारुच्या नशेत शिवीगाळ व हाताने मारहाण करुन, मानसिक व शाररिक त्रास देत असे त्या त्रासाला कंटाळुन रागाच्या भरात उंदीर मारण्याचे औषध पिवून, आत्महत्या करण्यास प्रवृत केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील ९५९५५१५९११ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५७१/१९,भादविक ३९५,१४३,१४७,१४८,१४९,४७२,महा.पो.ॲ.क. ३७ (१)(३) सह १३५ आणि क्रि.लॉ. अमेंडमेंट कलम ७ |
| **फिर्यादी** | बाळकृष्ण राऊत, वय ३५ वर्षे,रा.वडगाव बू//,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी १५ ते २० इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०८/२०१९ रोजी रात्रौ २१/३० वा.चे सुमारास समर्थनगर,वडगाव बु//,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद १५ ते २० इसमांनी दुचाकी वरुन येवुन दहशत निर्माण करुन, फिर्यादी यांची दुचाकी व चारचाकी वाहनांवर कोयता व दगडांनी मारुन फोडून नुकसान करुन, तसेच फिर्यादी यांचे गाडीच्या काचा फोडुन फिर्यादी यांचे १५ हजार रुपयांचे नुकसान केले असता फिर्यादी यांनी त्यांना माझी गाडी का फोडता असे विचारले असता फिर्यादींच्या डाव्या हाताचे कोपरावर वार करुन, फिर्यादी यांना जखमी करुन, फिर्यादी यांचा ६ हजार रु.किं.चा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून तसेच फिर्यादी यांच्या राहते परिसरातील इसम नामे विजय जगताप, समिर शेख, याचे हातावर,डोक्यावर कोयत्याने वार करुन, गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गायकवाड ९८२३७११७१८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**